## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनीधी) दि. ७: कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात आयोजित इंडक्शन प्रोग्राम अंतर्गत मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव येथील डॉ. विजय लोहार यांचे 'भाषेतून रोजगाराच्या संधी' या विषयावर व्याख्यान झाले.

भाषेच्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षण, शासन-प्रशासन, पत्रकारिता, मनोरंजन, रेल्वे, बँक, न्यायालय, भाषा अधिकारी, अनुवादक, दुभाषिक, लघुटंक लेखक, राजभाषा अधिकारी, रेडिओ कार्यक्रम अधिकारी, निवेदक, कंटेंट रायटर, ब्लॉग व व्हॉग लेखन अशा विविध क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याचे डॉ. लोहार यांनी सांगितले. भाषा तांत्रिक स्वरूपात आत्मसात करण्यासोबतच व्याकरण, संवाद कौशल्य, लेखन कौशल्य व सृजनशीलतेवर प्रभुत्व मिळविण्याचे आवाहन त्यांनी केले. नियमित वाचन, मनन-चिंतन, शब्दकोशाचा अभ्यास आणि विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे होते. डिजिटल प्लॅटफॉर्मचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांनी स्वतः रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात. परिस्थितीला दोष न देता स्व-निरीक्षण व स्व-परीक्षणातून प्रगती साधावी, असे त्यांनी सांगितले. आत्मविश्वास आणि चिंतनशील विचारसरणी विकसित करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी भाषा अभ्यास प्रशाळेतील सहकारी प्राध्यापक डॉ. दीपक खरात, प्रतिभा गलवाडे, डॉ. सुदर्शन भवरे, सहयोगी शिक्षक प्रीती मनुचारी, निखिल तायडे, महेश सूर्यवंशी, संशोधक विद्यार्थी खेमराज पाटील, सुकन्या जाधव, शिक्षकेतर कर्मचारी तसेच प्रशाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रीती सोनी यांनी तर आभार निखिल तायडे यांनी मानले.

**बातमी क्र. २**

जळगाव (प्रतिनीधी) दि. ७ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात आयोजित इंडक्शन प्रोग्राममध्ये आरजे शुभांगी बडगुजर (आरजे मनभावन रेडिओ केंद्र) यांचे 'शब्द ते संवाद आणि संवाद ते प्रभाव' या विषयावर व्याख्यान झाले.

शुभांगी बडगुजर यांनी शब्द मनापर्यंत पोहोचल्यावरच त्यांचा प्रभाव निर्माण होतो, असे सांगत 'आपला आवाज हीच आपली ओळख आहे' असे स्पष्ट केले. संवाद साधताना श्वासावर नियंत्रण, भाषेतील आरोह-अवरोह, स्पष्ट उच्चार आणि बोलीभाषेचा प्रभावी वापर महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. 'तानसेन होण्याआधी कानसेन झाले पाहिजे', असा मोलाचा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

अध्यक्षीय भाषणात भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे यांनी विद्यार्थ्यांनी शब्दांवर प्रेम करावे, असा सल्ला दिला. शब्दांची बीजे प्रभावी विचारांसाठी महत्त्वाची असून, जाणिवा, अनुभूती व विचारांचे संवर्धन विद्यार्थ्यांना 'शब्दयात्री' बनवते. शब्दांच्या माध्यमातून विचारांचे सौंदर्य व्यक्त होते; त्यामुळे भाषेच्या विद्यार्थ्यांनी सातत्याने शिकत राहून शब्दयात्री होण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास मराठी विभागाचे सहकारी प्राध्यापक डॉ. दीपक खरात, इंग्रजी विभागाच्या प्रतिभा गलवाडे, सहयोगी शिक्षक प्रीती मनुचारी, निखिल तायडे, महेश सूर्यवंशी, सुकन्या जाधव तसेच शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. प्रीती सोनी यांनी तर आभार खेमराज पाटील यांनी मानले.

**बातमी क्र. ३**

जळगाव (प्रतिनीधी) दि. ७ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राच्या वतीने आयोजित इंडक्शन प्रोग्राम अंतर्गत आज दिनांक ७ सप्टेंबर रोजी डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांचे 'आजचा युवा' या विषयावर व्याख्यान झाले.

यावेळी डॉ. लेकुरवाळे यांनी युवा हा संकल्पनाधिष्ठित, ऊर्जावान व वायूवेगाने कार्य करणारा असावा, असे सांगितले. मोठे व्हायचे असेल तर विनम्र व्हायला शिका, कारण विनम्रता मनुष्याला श्रेष्ठ बनवते, असा मोलाचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. शिक्षित आणि सुशिक्षित यातील फरक स्पष्ट करताना सुशिक्षित व्यक्ती चहूबाजूंनी विचारमंथन करून प्रगल्भपणे निर्णय घेते, असे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे यांनी युवकांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून ध्येयप्राप्तीसाठी कार्यप्रवण राहावे, असे सांगितले. अडचणींना दूर सारून झेप घेण्याचे सामर्थ्य युवकांमध्ये असावे. शरीरासोबत मनाचाही व्यायाम करून आपली ऊर्जा योग्य दिशेने वापरल्यास ध्येयसिद्धी शक्य आहे, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास सहकारी प्राध्यापक डॉ. दीपक खरात, डॉ. सुदर्शन भवरे, प्रतिभा गलवाडे, सहयोगी निखिल तायडे, महेश सूर्यवंशी, संशोधक विद्यार्थी खेमराज पाटील, सुकन्या जाधव तसेच शिक्षकेतर कर्मचारी व प्रशाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. महेश सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले, तर निखिल तायडे यांनी आभार मानले.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जनसंपर्क विभाग

**बातमी क्र. ४**

जळगाव, दि. ७ सप्टेंबर २०२६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील संगणकशास्त्र प्रशाळेत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी एमसीए प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेची चौथी फेरी पूर्ण झाली असून, या फेरीनंतर अभ्यासक्रमातील कोणतीही जागा रिक्त उपलब्ध नाही.

मात्र, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी सर्व प्रकारच्या प्रवेशांच्या अंतिम मुदतीपूर्वी एखाद्या विद्यार्थ्याने आपला प्रवेश रद्द केल्यास आणि त्यातून जागा रिक्त झाल्यास, अशी जागा रिक्त म्हणून ग्राह्य धरली जाईल. त्यानंतर विद्यापीठाच्या प्रवेश नियमांनुसार संबंधित रिक्त जागेचे वाटप करण्यात येईल. त्यामुळे प्रवेशाच्या अंतिम मुदतीपर्यंत निर्माण होणाऱ्या संभाव्य रिक्त जागांबाबत विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या अधिकृत सूचनांकडे लक्ष ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

एमसीए अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंदर्भातील माहिती, प्रवेश प्रक्रिया तसेच प्रवेशाचे वेळापत्रक विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेशासंदर्भातील अद्ययावत माहिती जाणून घेण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला नियमित भेट द्यावी.

अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी संगणकशास्त्र प्रशाळेतील प्रा. डॉ. संदीप भामरे यांच्याशी संपर्क साधावा, असे प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. राकेश जे. रामटेके यांनी कळविले आहे.

..........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ७ सप्टेंबर, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता